**उपक्रम** • डॉ. घोगरे महाविद्यालयात सायबर वॉरियर्सचा करण्यात आला सत्कार

# सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी २१२ सत्रातून ४६ हजार जणांना केले जागृत

प्रतिनिधी | धुळे

शहरातील शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या डॉ. पां. रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभाग आणि क्विक हिल फाउंडेशनतर्फे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अभियान राबवण्यात आले. या अभियानात संगणक शास्त्राच्या ३० विद्यार्थ्यांनी दोन महिन्यांत शहरासह जिल्ह्यातील १२९ शाळा, महाविद्यालयातील ४६ हजार ५३२ विद्यार्थ्यांना २१२ मार्गदर्शन सत्रातून सायबर गुन्हेगारीपासून वाचण्यासाठी काय करावे याची माहिती दिली. त्याबद्दल सायबर योद्ध्यांचा सत्कार झाला. विद्यार्थ्यांना क्विक हिल फाउंडेशनच्या चेअरपर्सन अनुपमा काटकर यांनी पदक दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील होते. सायबर कायदा तज्ज्ञ ॲड. चैतन्य भंडारी, विभाग प्रमुख प्रा. डॉ. राकेश देवरे, अभियानाच्या समन्वयक प्रा. डॉ. स्वाती बोरसे आदी उपस्थित होते. ॲड. चैतन्य भंडारी म्हणाले की, डिजिटल अँरेस्ट हा सगळ्यात मोठा सायबर गुन्हा आहे. डिजिटल अँरेस्टमध्ये कशी फसवणूक केली जाते, त्यापासून आपण कसे वाचू शकतो, काय काळजी घ्यावी याची माहिती त्यांनी दिली. प्राचार्य डॉ. एम. व्ही. पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर सांभाळून करावा. सोशल मीडिया प्लॅटफॉर्ममुळे आई-वडिलांना त्रास होऊ नये याची काळजी घ्यावी. तसेच जबाबदारीने वागावे असेही ते म्हणाले. दामिनी मोरे, संजना देसले आणि शुभांगी देवरे यांनी मनोगत व्यक्त केले.



डॉ. पां.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयात कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.

### ज्येष्ठांमध्येही प्रबोधन

सायबर योद्ध्यांनी सायबर गुन्ह्यापासून वाचण्यासाठी काय काळजी घ्यावी याची माहिती देण्यासाठी वृद्धाश्रम, ज्येष्ठ नागरिक संघ, अंधशाळा, मूकबधिर शाळा, न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय, आदिवासी वस्ती, विविध मंदिरे, आशा वर्कर्स, बसस्थानक, आदिवासी वस्ती आदी ठिकाणी कार्यक्रम घेतले.

**यांचा करण्यात आला सत्कार** कार्यक्रमात बेस्ट प्रोसेस कंपलाइन्स या श्रेणीत पुरस्कार रितिका माळी व मयूरी पाटील यांना मिळाला. रनरअप पुरस्कार दामिनी मोरे आणि निकिता पाटील यांना मिळाला. हायेस्ट ऑफलाइन आउटरीच श्रेणीत लक्ष्मी शिंपी आणि तेजस्विनी पवार विजेत्या तर प्रांजली कंकराज आणि दीपाली भामरे उपविजेत्या ठरल्या. हायेस्ट ऑनलाइन आउटरीच श्रेणीत स्नेहल रघुवंशी आणि शुभांगी देवरे विजयी तर संजना देसले आणि जानवी वाघ उपविजयी ठरले. विद्यार्थ्यांनी पालकांसह पदक व प्रमाणपत्र स्वीकारले. या वेळी क्लब ऑफिसर साक्षी देवरे, अजय खैरनार, प्रशांत भदाणे आणि श्रेया विसपुते यांचा सत्कार झाला.

पिंपळनेर बसस्थानकाचे दीड

पिंपळनेरला आमदार अग्रवाल यांच्या सत्कारासह झाला मेळावा

शिंदखेड्याती